VOLUME - IX, ISSUE - I - JUNE - NOVEMBER - 2020
**ROYAL - ISSN 2278 - 8158 - IMPACT FACTOR - 5.756** (www.sjifactor.com)

# ४. महाराष्ट्रातील आदिवासांच्या विकासात शासकीय योजनांचे यश अपयश

**शुभांगी सुधाकर होवाळ**
संशोधिका, संत गाडगेबाबा महाविद्यालय, परंडा.
**डॉ. शहाजी एस. चंदनशिवे**
शिक्षण महर्षी गुरुवर्य आर.जी. शिंदे महाविद्यालय, परंडा, जि. उस्मानाबाद.

## १.१ प्रस्तावना

२१ व्या शतकातील खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासी समाज आजही मोठ्या प्रमाणात मागासलेला आहे. त्यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रमुख समस्या आहेत. या समस्या सोडविल्याशिवाय भारतातील आदिवासींचा खऱ्या अर्थाने विकास होऊ शकणार नाही. या समस्या लक्षात घेऊन शासन आणि ऐच्छिक संघटनांनी आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी विशेष उपक्रम राबवित आहे. भारतीय संविधानात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचा विकास करण्याच्या दृष्टिने अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या. आदिवासी समाजांना इतर समाजाबरोबर आणण्यासाठी विशेष सोयी आणि सवलतीची तरतूद भारतीय संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली आहे. त्यांना सर्व प्रकारचे हक्क प्रदान करून त्यांच्या हिताचे संरक्षण करण्यात आले आहे. दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासी समाजांना आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने अनेक योजना राबविल्या व राबवित आहे. बदलत्या परिस्थितीनुसार आणि गरजेनुसार या समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या योजनांची निर्मिती केली. शासनाने १९७५ पासून आदिवासी समाजाच्या विकासासाठी महत्त्वकांक्षी उपक्रम / योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. आदिवासी विकासाला चालना देण्यासाठी भारत सरकारने पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात.

महाराष्ट्र शासनाने आदिवासी समाजाच्या लोकांचे जीवनस्तर उंचावण्यासाठी आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

## १.२ संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
२. विविध योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.
३. प्रशासन राबवित असलेल्या योजनेचा अभ्यास करणे.
४. विविध योजनेवरील खर्चाचा अभ्यास करणे.

## १.३ संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय साहित्य सामग्रीचा वापर केला आहे. त्यामध्ये विविध पुस्तके, मासिके, लेख, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट इ.चा वापर केला आहे.

**१.४ शासनाच्या विविध योजना**

**अ) शासकीय आश्रमशाळा समूह योजना**

दुर्गम व डोंगराळ प्रदेशात वास्तव्य असलेल्या आदिवासींच्या शैक्षणिक विकासाच्या दृष्टिने सन १९७२-७३ पासून शासकीय आश्रमशाळा समूह योजना राबविण्यात येत आहे. या शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी ते १२ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. या शाळेत विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेष, अंथरून, पांघरूण, पुस्तके आणि इतर लेखन साहित्य नियमानुसार पुरविण्यात येते.

**ब) व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता देण्याची योजना**

उच्च व्यवसासिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्वासाधारण शिक्षणक्रमापेक्षा जास्त खर्च येतो. त्यामुळे बरेच विद्यार्थी खर्चिक व्यवसायिक शिक्षण घेत नाहीत किंवा आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने मध्येच सोडून देतात. याकरिता विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या इतर आर्थिक सवलतीशिवाय व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १० महिण्यांच्या कालावधिसाठी जादा निर्वाहभत्ता देण्यात येतो.

**क) मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मध्ये अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना हे प्रशिक्षण देऊन त्यांना नौकरी मिळवून देणे हा मुख्य उद्देश आहे. या केंद्रामध्ये उमेदवारांन मोफत निवास व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आणि भोजन व दरमहा ४५० रू. विद्यावेतनही दिले जाते.

**ड) व्यवसाय प्रशिक्षण योजना**

आदिवासी युवकांकरिता स्थानिक गरजांवर आधारित लहान लहान प्रशिक्षण अभ्याक्रम राबवून त्यांना स्वंयरोजगाराची संधी देणे. तसेच आदिवासी भागातील लोकांना अत्यंत गरजेचे यंत्रे व अवजारे स्थानिकरित्या दुरूस्त करून घेण्याच्या दृष्टीने कारागीर उपलब्ध करून देणे. हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. यात इलेक्ट्रीशिअन, ऑईल इंजिन / इलेक्ट्रीक मोटार दुरूस्ती, मोटार मेकॅनिक इ. अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणाचा कालावधी ४ महिने असतो. प्रशिक्षणार्थीच्या इच्छेनुसार ३ प्रकारच्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण त्यांना घेता येते.

**इ) स्वंयरोजगारासाठी वाहन खरेदीकरिता कर्जपुरवठा योजना**

आदिवासी समाजातील बेरोजगार तरूणांना स्वंयरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने स्वत:चे वाहन खरेदीकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे हा महामंडळाचा मुख्य उद्देश आहे. ही योजना एन.एस.एफ.डी.सी. नवी दिल्ली व शबरी महामंडळ यांच्या वित्तीय सहकार्याने राबविली जाते. या योजनेवर ९० टक्के रक्कम कर्ज रूपाने व १० टक्के रक्कम वयक्तिक सहभागाच्या माध्यमातून ही योजना राबविली जाते. या योजनेवर द.सा.द.शे. ६ टक्के सरळव्याज आकारले जाते.

**ई) स्वंयरोजगाराकरिता कल्पतरू फोटोस्टॅट (झेरॉक्स) मशीन करिता अर्थसहाय्य योजना**

आदिवासी बेरोजगार तरुणांना स्वंयरोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने फोटोस्टॅट (झेरॉक्स) मशिन खरेदीकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे या योजनेचा मुख्य उद्देश आहे. ही योजना एन.एस.एफ.डी.सी. नवी दिल्ली व शबरी महामंडळाच्या सहकार्याने राबविली जाते.

**३) अनुसूचित जमातीच्या उमेदवारासाठी सेवा योजना नोंदणी**

अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नाव नोंदणी सेवायोजना कार्यालयात करण्यात येत होती. परंतु या उमेदवारांना संधी मिळण्यास फार विलंब होते. हे लक्षात घेऊन शासनाने मागासवर्गीयांच्या नाव नोंदणीचे काम समाज कल्याण विभागावर सोपविले. १९८४-८५ मध्ये आदिवासी विकास विभाग स्वतंत्र झाल्यानंतर हे काम प्रकल्प कार्यालयाकडे सोपविण्यात आले. गरजू सुशिक्षित उमेदवाराचे नाव नोंदवून ती विविध अधिकाऱ्याकडे शिफारस करून पाठविणे व त्यांना रोजगारांची संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

**निष्कर्ष शिफारशी**

आदिवासी समाजाच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजनेचा फायदा दऱ्याखोऱ्यातील आदिवासी समाजांना होत आहे. शासनाच्या विविध योजना ह्या खऱ्या गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहचत नसल्यामुळे त्यांचा आर्थिक, सामाजिक विकास मंदावला आहे. विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी ही प्रभाविपणे होत नसल्यामुळे अनेक बेरोजगारांना स्वंयरोजगारांच्या संधीपासून अलिप्त राहवे लागते. शासनाच्या प्रशिक्षण योजनांची जाहिरात ही दुर्गम आदिवासी भागातील उमेदवारांना माहितच होत नसल्यामुळे त्यांची इच्छा असून सुध्दा त्यांना ते मिळत नाही. त्यासाठी शासनाने आदिवासी समाजाच्या विकासासाठी असलेल्या विविध योजना ह्या तालुका पातळीवर सुरू कराव्यात जेनेकरून प्रत्येक तालुक्यातील आदिवासी बेरोजगारांना या विविध योजनांची माहिती मिळेल.

**संदर्भ सूची**

१. गारे गोविंद, आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे.
२. देवगांवकर एस.जी., आदिवासी विकास योजना, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३. आगलावे प्रदिप, भारतीय समाज प्रश्न आणि परिवर्तन, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
४. आकरे बी. एन., आदिवासीच्या जीवनावर सामुदायिक विकास योजनांचा झालेला परिणाम, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
५. गायकवाड प्रदिप, मागासवर्गीयांच्या विकास योजना, समता प्रकाशन, नागपूर.
६. देशपांडे व्ही. व्ही., शासकीय कर्ज योजना, श्री. चंद्रकांत भोईटे, रत्नजोत, ठाणे.
७. लोकराज्य मासिक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, ऑगस्ट २०१३.
8. www.maharashtra.gov.in.
9. www.nstfdc.com